# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
गणेशखिंड, पुणे—४११००७
दूरध्वनी क्रमांक: ०२०—२५६२१०४८/९
ई—मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621048/9**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**


परिपत्रक क्र.२०१ / २०२४ — दि. २६/०८/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सर्व सलंग्नित महाविद्यालये,
मान्यताप्राप्त परिसंस्था
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय — विद्यापीठ विभाग/संलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. प्राचार्य/संचालक शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक (ARC) व अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष समन्वयक (IQAC Co-Ordinator) यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करणेसाठी मुदत वाढीबाबत.......**

मा. महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षामध्ये संशोधन प्रकल्प आविष्कार/अन्वेषण नॅक संदर्भातील कामे व इतर संशोधन योजना अशा अनेक योजनांची प्रभावी व विहीत वेळेत अंमलबजावणी करण्यासाठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य/संचालक शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक (ARC) व अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष समन्वयक (IQAC Co-Ordinator) म्हणून नेमण्यात येते. याबाबतची माहिती अद्ययावत करण्याकरीता संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमार्फत वारंवार विनंती करण्यात आली आहे.

आविष्कार स्पर्धेमध्ये सहभागी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील शैक्षणिक आणि संशोधक समन्वयक (ARC) यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार मानधन देण्यात येते व नॅक संदर्भातील कामाकरीता अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष समन्वयक (IQAC Co-Ordinator) यांची नेमणूक केली जाते.

या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये संलंग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था /विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील एका अध्यापकास शैक्षणिक आणि संशोधक समन्वयक (ARC) व एका अध्यापकास अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष समन्वयक (IQAC Co-Ordinator) म्हणून नामनिर्देशन करून अध्यापकांची संपूर्ण माहिती खाली नमूद केलेल्या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने भरून सहकार्य करावे. संबंधीत भरलेल्या माहितीची एक प्रत अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षास **दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत** सादर करावी, यांची नोंद घ्यावी.

**unipune.ac.in--BOD Online --Enter Your Credentials --In Urgent Notification Tab--Online ARC information**

जेणेकरून संशोधन स्पर्धा, नॅक संबधीत कार्यवाही व इतर संशोधन योजना या सर्वांशी जलद व प्रभावीपणे संपर्क करणे शक्य होईल.

सबब, संबधीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी **शनिवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत** वरील माहिती ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करुन सहकार्य करावे.

आपला,

प्रा. डॉ. संजय ढोले
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ